# जलयुक्त शिवार अभियानात झालेल्या कामामुळे





# स्थलांतराचा प्रश्न सुटला व पिकाला मिळाली संजीवनी

साऊर हे भातकुली तालुक्यातील अमरावती चांदूरबाजार रोड पासून ७ कि.मी.व अमरावती परतवाडा रोडवरून १० कि.मी. अंतरावर वसलेले आहे. गावाची एकूण लोकसंख्य ४६८२ आहे गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार गेल्या ५० वर्षा पासून एकच प्रश्न सुटत न्हवता तो म्हणजे गावाच्या भोवताली विळखा घालून जाणारा नाला पावसाळ्यामध्ये पाऊस पडला कि शेतकऱ्यांना शेतात सुद्धा जाता येत नव्हंते एवढेच नाहीतर जास्त प्रमाणात पाऊस झाल्यास नाल्याचे पाणी गावामध्ये सुद्धा घुसायचे त्यामुळे बरेच गावकरी कितेकदा स्थलांतरित व्हायचे व जोपर्यंत पाणी कमी होत नाही तो पर्यंत सुरक्षित ठिकाणी राहायचे, हि

समस्या बरेचदा लोकप्रतिनिधीनी शासन स्तरावर मांडली परंतु कधी पैश्यांचा अभाव तर कधी राजकारण व स्वार्थाने हा प्रश्न तसाच राहिला,

असे म्हणतात " गरज हि शोधाची जननी आहे " अशातच डिसेंबर २०१२ पासून भातकुली तालुक्यामध्ये कृषी समृद्धी समन्वइत कृषी विकास प्रकल्पाची सुरवात झाली व विकास सहयोग प्रतिष्ठान मुंबई या संस्थेने प्रकल्पाची पहिली ग्रामसभा घेतली त्यावेळी गावकऱ्यांनी नाल्याचा प्रश्न मांडला संस्थेने २०१३ पासून हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न चालविला त्यानुसार ग्रामपंचायतचा ठराव शेतकऱ्यांचे संमतीपत्र घेऊन नाल्याचे सर्वेक्षण मा.कृषी अधिकारी यांचे माध्यमातून केले परंतु नाला खोलीकरणाचे काम करण्याची तांत्रिक अडचण कृषी विभागाला येत असल्यामुळे नालाखोलीकरनाचे काम पुन्हा एक वर्षा साठी स्थगित झाले, नंतर २०१५ मध्ये शासनाच्या जलयुक्त शिवार योजनेला सुरवात झाली व उपविभागीय अधिकारी महसुल यांनी कृषी समृद्धी प्रकल्पाच्या माध्यमातून विकास सहयोग प्रतिष्ठान या संस्थेला मृदा व जलसंधारनाची कामे करण्यासाठी प्रस्ताव मागितले त्याप्रमाणे संस्थेने क्लस्टर मधील साऊर सह प्रस्तावित ५ नाल्याचे T.S. सादर केले व त्याला कृषी विभागाने मंजुरात दिली व कामाला सुरवात झाली .

माहे मे.२०१५ मध्ये गावापासून सुमारे ९०० मीटर चे काम पूर्ण झाले. प्रथम पाऊस २ ते ३ वेळा झाला. गावातील पाणी नालाखोलीकरणामुळे सरळ वाहु लागले. अशातच दि.२७ ऑगस्ट २०१५ ला सतत १८ ते २०

तास पाऊस आला परंतु नाल्याचे पाणी गावामध्ये न येता ते शेतामध्ये वाहून गेले. या पूर्वी अश्याप्रकारचा पाऊस झाल्यास गावकऱ्यांच्या घरामध्ये पाणी घुसायचे व सर्व कुटूम्बाला गावातील सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित व्हावे लागत असे. परंतु या वर्षी नाल्यामुळे कुठलीही आपत्ती न येता गावकऱ्यांनी सुटकेचा श्वास घेत आपल्याच घरामध्ये थांबले, यानंतर दुसरा पाऊस न झाल्यामुळे शेतकऱ्यांनी तूर व चना या पिकांना नाल्यातून पाणी सुधा दिले.

अशा रीतीने " जलयुक्त शिवार अभियानात झालेल्या कामामुळे स्थलांतराचा प्रश्न सुटला व पिकला मिळाली संजीवनी,